वर्ष २१
अंक ६ वा
डिसेंबर १९४७

# समाजस्वास्थ्य



संपादक -
र. धों. कर्वे.
एम. ए.

किंमत
४
आणे

# अनुक्रमणिका


| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | कामवासनेवर बहिष्कार-३ ... ... ... | ११९ |
| २ | हात टेकले ! ... ... ... ... | १२५ |
| ३ | 'चूल व मूल' ... ... ... ... | १२९ |
| ४ | पत्रव्यवहार ... ... ... ... | १३३ |
| ५ | शारदेचें पत्र ... ... ... ... | १३७ |
| ६ | किरकोळ ... ... ... ... | १४२ |



## अजंटांचीं नांवें

मुंबई : श्री. विठ्ठल बाबू बागवे, न्यूज एजंट, दादर.

**पुणें :** अल्. के. जोशी, बुकसेलर
डी.. अेच्. शहा, बुकसेलर.

**कोल्हापूर:** स्कूल अॅन्ड कॉलेज बुकस्टॉल.

**बेळगांव:** जे. एम. माणूरकर, खडे बाजार.

**अहमदनगर:** पी. जी. बापट, बुकसेलर, नवी पेठ

**निपाणी :** के. एस्. बळगुगी

**ग्वाल्हेर :** डांके ब्रदर्स, लष्कर.

**कुमठा :** आर्. एम्. कामत

**नागपूर :** सी. सी. ताठे, नवयुग न्यूज अेजन्सी.

**गोकाक :** पी. एम्. शिरगांवकर

**सावंतवाडी :** विनायक के वाडकर.

अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय.

# कामवासनेवर बहिष्कार–३

देवांना कांहीतरी अर्पण करण्याची संधि गरिबांनाही मिळावी म्हणून अेखादी वस्तु अर्पण करण्याऐवजी मनुष्यानें स्वतःला सुख देणारी अेखादी क्रिया वर्ज्य समजावी, येथपर्यंत प्रगति (!) झाल्यावर अशी अेखादी क्रिया सर्वांनीच वर्ज्य समजावी, किंवा निदान अेखाद्या विशिष्ट प्रसंगापुरती समजावी, ही कल्पना आली आणि ती अंमलांत यावी म्हणून तसें न केल्यास अमुक भयंकर परिणाम होअील अशीहि शक्कल निघाली. कोणी म्हणेल की हें सर्व अत्यंत पोरकट आहे, देवांना कांही अक्कल आहे असें धरून चाललें तर अेखाद्या सुखापासून अलिप्त राहणारा मनुष्य त्यांना अधिक प्रिय कां व्हावा याचें कारण सांगतां येणार नाहीं. पण प्राथमिक लोकाचीं मनें लहान मुलांप्रमाणेंच पोरकट असतात.

देव हे मनुष्याचे शत्रु आहेत, म्हणजे त्याच्या सुखाचे शत्रु आहेत असें धरून चालल्यावर अेखाद्या माणसाचें सुख कमी झाल्यानें त्यांना आनंद होणें साहजिक आहे. तेव्हां ते अधिक खुष व्हावे म्हणून अेखाद्या सुखाची सर्वांनाच बंदी करणेंही साहजिक आहे. अमुक दिवशीं सर्वांनी उपास केला पाहिजे ही कल्पना अशाच प्रकारची आहे. हल्ली अशा कल्पनांचा अंमल कडक नाहीं ही गोष्ट वेगळी, परंतु अेका काळीं तो कडक होता. आषाढी अेकादशीला उपास न करणारा मनुष्य जेव्हां भयंकर समजत असत, तो काळ अजून फारसा जुना झाला नाही.

समागमाची गोष्ट अन्नापेक्षा थोडीशी वेगळी आहे. समागमाची अिच्छा कितीही तीव्र असली तरी शरीराला अन्नाची जरूरी त्यापेक्षाही जास्त आहे. यामुळे अन्नाचे बाबतींत फारसा त्याग करतां येत नाही, पण समागमाचे बाबतींत कितीही कडक निर्बंध घातले तरी मनुष्य मरत नाही, यामुळे विलक्षण कडक निर्बंध घालण्यांत आले आणि देवांना या निर्बंधांमुळे फारच आनंद होतो अशी कल्पना रूढ झाली. अन्नाचे बाबतींत कित्येक वेळां उपोषण करणें कर्तव्य मानलें, तरी निदान भक्षणाचें अिंद्रिय जें तोंड, तें अश्लील ठरवलें नाही आणि तें उघडें ठेवलें किंवा त्याचें नांव घेतलें तरी चालतें. परंतु समागमाच्या अिंद्रियांचें कार्यच नव्हे तर त्यांचीं नांवें देखील निषिद्ध झालीं आणि तीं कांहीही कारणाने उघडीं राहतां नयेत असा कडक निर्बंध अंमलांत आला. तो अितका की कोणी आपलें अिंद्रिय उघडें ठेवून वावरूं लागला, तर त्याला वेड लागलें आहे असेंच लोक समजतात, कारण अेरवी हे निर्बंध धाब्यावर बसवण्याचा धीर कोणाला होणें शक्यच नाही.

या निर्बंधांना अर्थातच सामाजिक कारणेंही होतींच. प्राथमिक समाजांत जेव्हां असे निर्बंध नसतील, तेव्हां बहुधा कामवासनेमुळें अेकमेकांत स्पर्धा उत्पन्न झाल्यामुळें मारामाऱ्या, घातपात होत असावे. ते कमी करण्याकरतां यांतले कांही निर्बंध उपयुक्त ठरले असतील, यामुळें त्यांना अधिकच पाठिंबा मिळाला असेल. शिवाय स्वार्थामुळे मनुष्याला शक्य तितक्या वस्तु आपल्या मालकीच्या असाव्या अशी अिच्छा होते. ही अिच्छा अितर प्राण्यांत देखील दिसते आणि ती त्या वस्तूच्या उपयुक्ततेवर देखील अवलंबून नसते. आपल्या मालकीची वस्तु दुसरा नेतो अेवढ्यावरूनच मनुष्य संतापतो. हल्ली अेका मनुष्यानें दुसऱ्यावर मालकीहक्क सांगणें आपण गैर समजतों, यामुळेच गुलामगिरी बेकायदा ठरली. रोमन लोकांत मुलाने बापाचें न अैकलें तर त्याला देहांत शासन करण्याचा अधिकार बापाला असे. पत्नीला व्यभिचार करतांना पकडली तर तिला ठार मारण्याचा पतीचा हक्क

पुष्कळ देशांत होता. हल्ली तिला ठार मारण्याबद्दल कदाचित् फारशी शिक्षा होणार नाही, पण हल्ली तो हक्क मानीत नाहीत. परंतु प्राचीन काळीं मालकीहक्क निर्जीव वस्तूंवरच नव्हे तर पशूंवर आणि माणसांवर देखील असे. बायकांना जबरदस्तीने पळवून नेऊन त्यांच्याशीं लग्न करण्याची पद्धत आपल्याकडेही होतीच. सुभद्राहरणाची महाभारतांतील कथा सौभद्र नाटकासारखी नाही. मूळची गोष्ट अशी आहे की अर्जुन सुभद्रेकडे टक लावून पहात आहे असें पाहून कृष्णाने सांगितलें, 'अरे, ती माझी बहिण सुभद्रा. तिचें लवकरच स्वयंवर व्हायचें आहे, पण या मुलींना काहीं अक्कल नसते, ती कोणाला माळ घालील याचा नियम नाही, तेव्हां ती तुझ्या मनांत भरली असली तर तिला पळवून नेऊन लग्न कर. तुझा प्रतीकार करण्याचें सामर्थ्य यादवांत नाही. ' हा उपदेश प्रत्यक्ष भगवद्गीता सांगणाऱ्या कृष्णानें केला आहे. तेव्हां ही लग्नाची पद्धत क्षत्रियांत प्रतिष्ठित समजत असत आणि अशाच आणखीहि गोष्टी महाभारतांत आहेत. अेखादी वस्तु जशी शत्रूकडून जबरदस्तीनें घ्यायची, तशीच मुलगी आवडली की तीही पळवून न्यायची, अशी स्थिति होती. म्हणजे स्त्रीचा दर्जा निर्जीव वस्तूअितकाच होता.

आपली स्त्री आणि तिच्यापासून झालेलीं मुलें आपल्या मालकीचीं आहेत, अशीच भावना प्राथमिक गटांत असे आणि स्त्री ही केवळ कामशांती-करतांच नव्हे तर सर्व प्रकारच्या घरकामालाही उपयोगी पडत असे. मुलींवरही बापाची मालकी असे, पण तिचा उपयोग कामशांतीकरतां होतां नये असा निर्बंध कालांतराने उत्पन्न झाला. तरी बापाला पुत्र नसल्यास पुत्रोत्पत्तीपुरता मुलीशीं संबंध ठेवण्याचा हक्क होता. त्याचप्रमाणें पत्नीशीं देखील मनसोक्त समागम करतां नये, त्याकरतां अमुक दिवशीं परवानगी आहे, अमुक दिवशीं नाहीं, असेहि निर्बंध उत्पन्न झाले. दारू पिणें हें पुष्कळ देशांत पाप मानलें असलें तरी कित्येक देशांत त्याला अजीबात बंदी न करतां विक्रीची

वेळ नेमून देतात, त्याच जातीचे हे निर्बंध आहेत. ज्या गोष्टीमुळें सुख होअील ती वर्ज्य मानल्यानें देवांना आनंद होतो, ती अजीबात वर्ज्य मानतां येत नसेल तर निदान तिच्यावर जितके निर्बंध घालतां येतील तितके चांगलेच, अशी भावना प्राथमिक गटांत उत्पन्न झाली आणि ती अजून सुधारलेल्या समाजांत देखील दृष्टीस पडते.

या भावनेला रोगांमुळेही मदत झाली असेल यांत शंका नाही. बऱ्याच रोगांवर औषधेंही त्या काळीं माहीत नसत आणि जननेंद्रियांच्या द्वारें होणारे रोग विशेष भयंकर वाटत असत. अशा काळीं समागमांत पापाचा भास झाल्यास नवल नाहीं. शिवाय जेथे रक्ताचा संबंध येतो, तेथे लोक अजूनही भितात आाणि ही भीति अितकी खोल असते की शस्त्रक्रिया पहात असतांना रक्त दिसल्यामुळे कित्येक वैद्यकीय विद्यार्थ्यांना मूर्च्छा येते, आणि ती कां आली हें त्यांना समजत नाही, म्हणजे रक्ताच्या भीतीची जाणीव नसूनही ती खोल दडलेली असते. मग प्राचीन काळीं जेव्हां शरीराची पुरेशी माहिती नव्हती, तेव्हां स्त्रियांच्या मासिक स्रावाची भीति वाटत असे यांत नवल नाही. मासिक स्रावाचे वेळींच नव्हे तर प्रथमसमागमाचे वेळीं आणि प्रसूतीचे वेळींही रक्तस्राव होतो. तेव्हां स्त्रियांचा रक्ताशीं निकट संबंध असतो आणि रक्त म्हणजे भयंकर असल्यामुळें त्यापासून संरक्षणाची कांहीतरी व्यवस्था केली पाहिजे, असें वाटूं लागलें. संरक्षणाचा उत्तम मार्ग म्हणजे रक्ताशीं संबंध असलेल्या माणसांना अपवित्र, अस्पृश्य समजायचें. ही कल्पना केवळ स्त्रियांच्या मासिक स्रावापुरतीच होती असें नाही. फ्रेझरने 'न्यू गिनी' येथील अेका प्राथमिक गटासंबंधी अशी माहिती दिली आहे की त्यांच्यांतला अेखादा योद्धा शत्रूला मारून परत आला, तर त्याचा रक्ताशीं संबंध आल्यामुळे त्याला अस्पृश्य समजून वेगळ्या जागेंत ठेवीत असत आाणि त्याला आपल्या कुटुंबांतल्या माणसांनाही स्पर्श करण्याची परवानगी नसे. कोणीं स्पर्श केल्यास

त्याच्या अंगावर भयंकर व्रण उठतील अशी कल्पना रूढ होती. त्यानें लोकांपासून आपखुशीने दूर रहावें म्हणून स्पर्शाचे परिणाम लोकांवर होण्याअेवजी त्याच्यावरच होतील अशी भीति घातली. म्हणजे शत्रूला मारल्याबद्दल त्याची वाहवा होण्याअेवजी शिक्षाच होत असे आणि त्याला शुद्ध करण्याकरतां अनेक विधि करावे लागत असत. कामेंद्रियांवर बहिष्कार घालण्याचे बाबतींत रक्ताच्या या भीतीचा मोठाच उपयोग झाला यांत शंका नाहीं.

तेव्हां जननेंद्रियांची लाज वाटून तीं झांकून ठेवण्याची प्रवृत्ति कशी उत्पन्न झाली, याला कांहीं तर्कशुद्ध कारण दाखवतां येत नाही, आणि याचें कारण अितकेंच की हीं कारणें मनुष्याच्या प्राथमिक स्थितींत धार्मिक भीतीपासून उत्पन्न झालेलीं आहेत. अजूनही हिंदु समाजांत नग्न राहणें हें सनातनी लोकांच्या दृष्टीने पाप आहे, आणि आधुनिक दृष्टीला पटेल असें कोणतेंही कारण या कल्पनेच्या मुळाशीं दिसत नाही. धार्मिक दृष्टि म्हणजे या जगांत सुख जितकें जास्त होअील तितका मरणोत्तर धोका जास्त, तेव्हां या जगांत सुख जितकें कमी होअील तितकें बरें, कारण जीवन क्षणभंगुर आहे. यांतून अेक निष्कर्ष असा की सुखाकरतां समागम हें पाप आहे, समागमाला फक्त प्रजोत्पत्तीपुरतीच परवानगी असावी. महात्मा गांधीं-सारखे लोक अजून याच कल्पनांत गुरफटलेले दिसतात, कारण त्यांच्यावर धर्माचा पगडा अितका आहे की स्वतंत्र विचारशक्ति नष्ट झाली आहे. अशाच कल्पनांमुळे केवळ समागम नव्हे तर अिंद्रियाला स्पर्श करणें, तें झांकून ठेवण्याची शक्य तितकी काळजी न घेणें, किंवा जननेंद्रियांचा नुसता नामोच्चार करणें देखील पाप होऊन बसलें आहे. पण निर्बंध फार कडक केल्यास कोणी अैकणार नाही, म्हणून विवाह ही ह्यांतून पळवाट ठेवली आहे. म्हणूनच ब्रह्मचर्याचे अितके गोडवे गातात आणि क्रिस्ताचा अनुयायी 'सेंट पॉल' याने म्हटलें आहे की जळण्यापेक्षा विवाह बरा.

म्हणजे विवाहाशिवाय समागम केल्यास जळण्याची शिक्षा होईल (अर्थात् मरणोत्तर), त्याअैवजी विवाह हें लहानसें पाप बरें, पण अेकंदरींत ब्रह्मचर्यच श्रेष्ठ, विवाह हा गौण मार्ग. या प्राथमिक गटांतील भावना अजूनही सांपडाव्या याचें कोणाला आश्चर्य वाटेल, पण त्या आहेत हें आपल्याला दिसतें.

अशा गोष्टींना कांही तर्कशुद्ध कारण नसतें, म्हणूनच लहान मुलांनी 'असें कां ?' असा प्रश्न केल्यास, 'मी सांगतों म्हणून,' यापलीकडे उत्तर आअीबापांना देतां येत नाही. अिंद्रियाला हात लावूं नये, नागवें राहूं नये, वगैरे हुकूम आअीबाप सोडतात आणि त्यांचीं कारणें मुलांना समजत नाहीत. कदाचित् 'देव शिक्षा करतो' असेंही कारण सांगितलें, तरी 'कां शिक्षा करावी ?' हा प्रश्न राहतोच आणि त्याला उत्तर नाही. पण या कल्पना लहानपणींच मनांत बिंबल्यामुळें आपलें नग्न शरीर दुसऱ्याला दिसण्यापेक्षा मरण पतकरलें, अशी स्थिति पुष्कळांची, विशेषतः स्त्रियांची, होते. याच कारणामुळे अेखाद्या स्त्रीवर बलात्कार झाला तर ती अपवित्र झाली असें समजतात, असें अनेक नाटक-कादंबऱ्यांत दाखवलेलें असतें. याचें कारण अितकेंच की तो समागम विवाहाशिवाय झालेला असतो. विधवेशीं विवाह करतांना तिचा पूर्वी कोणाशीं समागम झाला आहे ही कल्पना पुष्कळांच्या मनांत येत नाही. अर्थात् कांहींच्या येते, म्हणूनच विधवा अक्षतयोनि असेल तरच तिला विवाहाची परवानगी असावी असें म्हणणारे पुष्कळ लोक निघाले. परंतु जेथे विधवाविवाह रूढ आहे तेथे अशी कल्पना येत नाही. पण कुमारिकेशीं विवाह करणें असेल तर मात्र ती कोणाशीं समागमाने अपवित्र झाली असल्याची शंका आल्यास तिचा विवाह अजूनही जवळजवळ अशक्य होअील. कांहीं थोडीं माणसें अलीकडे या बाबतींत तर्कशुद्ध विचार करूं लागलीं आहेत, पण बहुतेकांना तसा विचार करतां येत नाही, कारण लहानपणीं मनांत बिंबलेल्या कल्पना टाकून देणें कठिण असतें.

# हात टेकले !

लेखक, स० हृदय, महाड.

केरोपंत जरी ब्राह्मणेतर वर्गातील होते, तरी गांवांत ते मोठे सनातनी समजले जात असत. गांवांतील ते वतनदार असल्यामुळे प्रत्येक देवकीच्या कामांत ते पुढाकार घेत. जें जें म्हणून रूढ असेल त्यांत जरा सुद्धां फरक झालेला त्यांना खपत नसे. गांवकीच्या देवळाचे ते अेक पंच होते, त्यामुळे त्या देवतेची पालखी निघाली म्हणजे पालखीसमोर ते मिरवीत असत. भक्तां-पासून नारळ घेऊन त्याबदली देवतेचा अंगारा, अक्षता वांटण्याचें काम ते हमखास आपलें हक्काचें समजत.

पूर्वापार चालत आलेल्या रिवाजाप्रमाणें सालोसाल देवतेला त्या त्या वेळेप्रमाणें कोंबडा, बकरा आणि त्रैवार्षिक रेडा हा बळी दिला गेलाच पाहिजे, म्हणून सुधारक, नवविचारी लोकांशीं त्यांचा चालणारा झगडा ही नेहमींची बाब असे.

सरकारने लोकक्षोभाला मान देऊन त्या देवतेपुढे बळी दिला जाणारा रेडा बंद केला होता. राजसत्तेपुढें शहाणपण चालणार नाहीं, हें पाहून गांवांत कांहीं गैर प्रकार झाला, कोठे आग लागली, कधी कसली रोगराअी आली, म्हणजे गांवदेवता कोपली म्हणून त्यांचा प्रचार घरोघर चालू होअी.

परंतु अेक गोष्ट त्यांच्या मनाविरुद्ध नेहमी होअी. त्यांनी म्हातार-पणीं दुसरें लग्न करण्याचा आपला हक्क बजावला होता, त्यामुळे घरांतील तरुण देवता त्यांच्यावर नेहमी कोपलेली असे. ती त्यांना शांत करतां येत नसे.

जास्त पाल्हाळ न लावतां मी बऱ्याच गोष्टी वाचकांवर सोंपवून पुढें जातों. त्यांच्या गृहदेवतेने–गंगेने–त्यांना सतावल्यामुळें त्यांनी घराशेजारील 'माणसांचा' त्रास होऊं नये म्हणून आपली जागा बदलली होती. दुसऱ्या

जागेशेजारीं पण गंगेने अेक प्रेमिक शोधला, तीही जागा वाअीट होती, हवाशीर नव्हती, म्हणून केरोपंतांनी सोडून दिली.

कांहीही केलें तरी गंगेच्या वाहत्या वृत्तिप्रवाहाला त्यांना बांध घालतां येअीना. केरोपंतापुढें दोन अडचणी होत्या. गंगेला टाकून दिली, तर ती त्यांची विवाहित पत्नी म्हणून बाहेर वाटेल तशी वागेल आणि लोकनिंदा त्यांनाच अैकावी लागणार. हें तर त्यांना हमखास नको होतें. शिवाय म्हातारपणीं बायको संभाळतां येत नाही म्हणून टिंगल होअील ती निराळी. तो प्रश्न त्यांना कमी महत्वाचा वाटत नव्हता. दुसरें म्हणजे आपल्यासारख्या सच्छील माणसाच्या परिस्थितीचा फायदा घेऊन दुसऱ्यांनी खेळ खेळावेत, ही कल्पना त्यांना सहनच होण्यासारखी नव्हती आणि त्याला उपाय म्हणून ते आपलीं राहतीं घरें बदलीत राहिले.

सध्यां ते अेका दूरच्या घरीं राहूं लागले होते. आजूबाजूला शेतकऱ्यांचीं घरें होतीं. बिचारे शेतकरी! पोटापाण्याच्या प्रश्नांमुळे त्यांची परिस्थिति हलाखीची होती. त्यांना असले खेळ कोठून सुचायचे! त्यांत शेतकरी समाज देवभोळा असतो. केरोपंत 'देव घालण्यांत' अिलमी होते हें शेतकऱ्यांना माहीत होतें. पण त्यांचा तो अिलम गांवांतील तरुण हौशी लोकांवर चालत नसे हें त्यांना माहीत नव्हतें. त्यामुळें गंगेने कितीही नखरे केले तरी हे लोक तिच्या वाऱ्याला सुद्धां उभे राहीनात.

तरीसुद्धां गंगेची माहिती गांवांतील तरुणांना होतीच. कांहींना कांहीं कारण काढून ते त्या वस्तींत रेंगाळूं लागले. सगळे संकेत होत, पण तसल्या प्रकाराला जो अेकांत मिळावा लागतो, तो मिळणें हिंदु समाजांत किती दुरापास्त गोष्ट होती, हें गंगेला आतां पूर्णपणें पटलें होतें. तिची मात्रा चालेना. केरोपंताचा जय झाला होता.

त्या शेतकऱ्यांच्या आवाडांत अेका मुलाला मोठ्या 'बाया' आल्या होत्या. त्यामुळे मुलाच्या बापाने अेक भगत बोलावला. त्याने मांड भरवला

आणि त्या समारंभांत अेका स्त्रीच्या अंगांत देवता पण संचारली होती. त्यावेळीं केरोपंत तेथे हजर होते. त्या ‘ अंगांत ’ आलेल्या स्त्रीने फर्मावल्या-प्रमाणें सारें ‘ देणें ’ दिलें पाहिजे, हें केरोपंतांनी मान्य केलें. त्याप्रमाणें दुसरे दिवशीं त्या शेतकऱ्याने आपल्या लेकराला आराम पडावा म्हणून सारें कांहीं केलें.

त्याच सुमाराला ज्येष्ठ शुद्ध द्वितीया आली होती. गांवदेवतेची पालखी गांवांतून मिरवीत पायघड्यांवरून वाजत गाजत नेहमीच्या रिवाजाप्रमाणें निघाली. तोंच अेक अनपेक्षित प्रकार घडला. हळदकुंकवाचा मळवट भरून, कैंस पिंजारून, कमरकांस घट्ट लुगडें पिळवटून घेतलेली गंगा पालखी-पुढे आली आणि अंगांत संचारल्याप्रमाणें घुमूं लागली. सारे भक्त लोक बाजूला झाले. कोणी तिच्यापुढे लोटांगणें घातलीं, ‘ जय माते, जय भवानी ’ म्हणून कोणी गर्जना केल्या. तों तों गंगा विशिष्ट तऱ्हेनें अंगाला आळोखे-पिळोखे देऊन अंगांत आल्याप्रमाणें हातवारे करूं लागली.

हलके हलके पालखी पुढें जात होती, तसतशी ती पण पुढें सरकत होती. तिच्याभोंवती जास्त गर्दी जमूं लागली. अेका भक्तानें तिला विचारलें, “ हे माते, तुझें म्हणणें काय ?”

हें अैकतांच, ‘ हूं हूं, हां हां ! ’ असे शब्द करून ती नाचूं लागली.

“ भवानी मातेचे चांगभले ! ’ सर्व लोकांनी अेकच गजर केला.

गंगा बोलूं लागली. अर्थात् ती बोलतांना अंगांत आलेलें माणूस जसें हुंकार देऊन बोलतें, तसेंच बोलत होती. “ गांव…देवी…चा… देवीचा…रेडा बळी द्या. मला माझा रे…डा हवाय्. नाहीतर…नाहीतर…” गंगा हुंकारून थांबली.

“ भवानी मातेचे चांगभले, ” पुन्हा लोक गरजले.

“ ‘ नाहीतर गांवांत पटकी येअील…पलेग येअील… गांवावरनं नांगर फिरेल…” असें म्हणून गंगा पुन्हा जोरजोराने घुमूं लागली आणि पुढें

जाण्यासाठी सरकूं पण लागली.

"केरोपंत म्हणतात तेंच खरें होणार," दोघेजण बोलले.

"त्यांच्यासारख्या देवमाणसाच्या बायकोच्या अंगांत देवी येऊन बोलत आहे. खात्रीने तसें होणार," दुसरा अेकजण बोलला.

केरोपंत आसपास होतेच. त्यांना सर्व कांही कळत होतें, पण 'तेरे बी चूप मेरे बी चूप' या वृत्तीने त्यांना गप राहणें भाग होतें. आपल्या हिकमती बायकोचें बखोट धरून तिला ओढून नेतां येअीना, देवभोळे लोक पिसाळतील. न न्यावी तर ती लोकांच्या गर्दीत भिडून चालली होती. टारगट लोक तिच्या बांधीव शरीरयष्टीकडे पाहून आपल्या मनांत मांडे खात होते हें त्यांना दिसत होतें. कांही कांही तर तिला स्पर्श करून नमस्कारही करूं लागले होते. एकाने तर तिला धरून नीट सावरण्याचा आव आणला होता.

देवतेच्या देवळांत पालखी पोंचली, लोक गंगेभोंवती जमले, पुन्हा तोच तमाशा झाला, गंगेने गांवदेवतेचें 'मागणें' मागितलें.

"आमी ते औंदा देऊं," असें एक पंच ओरडतांच सर्वांनी हो, हो, करून त्याला साथ दिली.

"यंदां रेडा दिला पाहिजे," केरोपंत पण उद्गारले. त्यांनी ती संधि वायां दवडली नाही.

नंतर हळूहळू गंगेच्या अंगांत आलेलें देवतेचें वारें उतरलें. लोकांनी तिची छोटीशी मिरवणूक काढून तिला आपल्या घरीं नेऊन पोंचवली. केरोपंत मधल्या वाटेनें आपल्या घरीं अगोदर आलेच होते. लोक निघून जातांच केरोपंत तडक उठले आणि जवळच्या धुणीं वाळत घालण्याच्या काठीने गंगेला यथेच्छ दांडकून काढली. गंगा नेहमीप्रमाणें कांहीअेक ओरडली नाही. तिने ती वेळ मारून नेली.

परिणाम व्हायचा तोच झाला. लोक गंगाकडे येऊन तिच्याकडून अंगारा धुपारा घेऊं लागले. आपापल्या घरीं मांड भरवण्यासाठी तिला

घेऊन जाऊं लागले, आणि केरोपंत तिच्यासोबत असले म्हणजे तिच्या अंगांत देवी येत नसे, हें पण लोकांना हळूहळू कळूं लागलें. अनेक लोकांवर 'देव' घातल्यामुळे, केरोपंत पापी असले पाहिजेत अशी 'पुअी' उठण्यास वेळ लागला नाही.

केरोपंताशिवाय गंगा भगतगिरीला जाऊं लागली. तिचा धंदा वाढूं लागला तसतशी ती रातबेरात पण बाहेर जाऊं लागली. तिच्याशिवाय लोकांना गुण येअीनासा झाला, लोकांचीं दुःखें कमी होअीनाशीं झालीं, लोकांच्या हरवलेल्या वस्तु सांपडेनाशा झाल्या.

थोड्याच दिवसांत गंगा नामांकित धन्वंतरी ठरली आणि केरोपंतांनी तिच्यापुढे हात टेंकले.

---

# 'चूल आणि मूल'

श्री. विश्राम बेडेकर सनातनी आहेत, हें त्यांच्या 'पहिला पाळणा' या बोलपटावरून सिद्धच झालें आहे. त्याच धर्तीवर, म्हणजे सुधारकांची चेष्टा करण्याच्या उद्देशानेच 'चूल आणि मूल' हाही बोलपट काढला आहे. कदाचित् हे दोन्ही बोलपट केवळ गल्ल्यावर दृष्टि ठेवून काढले असतील, आणि बेडेकरांची मतें अितकीं मागसलेलीं नसतील, असें आम्हाला अेकानें सुचवलें, पण तीं त्यांचीं प्रामाणिक मतें आहेत असेंच धरून चालणें बरें दिसतें. चेष्टा करण्यांत बेडेकरांनी बरीच कला दाखवली आहे यांत शंका नाही, पण कित्येक ठिकाणीं आचरटपणा आणि बिनडोकेपणाही दिसतो. नायिकेचा आजा आणि आजी सुधारक आहेत, हें ताबडतोब समजावें म्हणून आजाचें नांव 'आगरकर' ठेवलें आहे, आणि आजाच्या कामाला जें पात्र निवडलें आहे (दामुअण्णा) तें असें की त्याला पाहिल्याबरोबर आपोआप विनोद उत्पन्न व्हावा. अर्थात् यांतही कला आहे, सुधारक असे बावळट

असतात ही सूचना द्यायची आहे, कारण अेरवीं दामूअण्णांची निवड करण्यास काणतेंही कारण दिसत नाहीं.

आजी ही मुंबअीची पहिली अेम्. अे. आहे आणि या बोलपटांत त्यावर कणीक ठेवतां यावी म्हणून तिने आपला अेम्. अे. चा दाखला जपून ठेवला आहे, कारण तो नेहमीच कणकेकरतां वापरला असता तर तो या बोलपटापर्यंत टिकला नसता. आजाने नायिकेला जो पोषाख दिला आहे, त्यांत पदराला फाटा दिला आहे आणि ती पुण्याच्या रस्त्यानें सायकलवरून जात असतां तिची चेष्टा करण्याकरतां तिच्या भोंवतीं टारगटांचा घोळका जमतो आणि त्यांच्या चेष्टांमुळें तिला खाली उतरावें लागतें. ती शेवटीं रडत घरीं जाते आणि आजा तिची समजूत घालतो. आपण सुधारकांनी कचरतां नये, लोकांना धडा घालून दिला पाहिजे, अि. अि.

कित्येक ठिकाणीं गिरणीकामगारांसाठी जशी मुलें संभाळण्याची व्यवस्था असते, तशी अेका सिनेमागृहाशीं ठेवावी अशी क्लृप्ति त्याच्या सुधारकी डोक्यांत येते आणि त्याप्रमाणें तो नातीच्या साह्याने करतो. आम्ही हा बोलपट पहात असतांना तेथें निदान दीडदोनशें लहान मुलें होतीं आणि प्रेक्षकांना त्यांचा त्रास होत होता आणि वरील व्यवस्था करायला जें कारण दाखवलें आहे, की लहान मुलें असलीं म्हणजे आयांना सिनेमा पाहतां येत नाही, तें खरें नाही हें उघड दिसतें. लहान मुलांचे कितीही हाल झाले तरी आपली स्वःची सिनेमा-नाटकांची हौस पुरवलीच पाहिजे, ही आज बायकांची वृत्ति आहे आणि याला शेंकडा अेक देखील अपवाद सांपडणार नाही. तथापि त्यांनी ही सोय केली, आणि अेका मुलाची आअी मेल्यामुळे बापाने त्या मुलाला आगरकरांच्या ताब्यांत देऊन तो पसार झाला. पण त्यानें मुलाचें काय होतें यावर नजर ठेवली आणि त्यांच्या मोकरणीशीं संधान बांधून तो वारंवार मुलाला भेटत असे. अर्थात् तें मूल नायिकेला पाळावें लागलें होतें आणि ती अेकदां त्याच्याकरतां दूधकेंद्रावर गेली असतां

तें तिचेंच मूल असा तेथल्या कारकुनाचा समज झाला.

पुढें तिचें लग्न अेका सनातनी घराण्यांत होतें. नवरा डाक्तर, सासरा अत्यंत खाष्ट आणि सासू अतिशय प्रेमळ दाखवली आहे. या सबंध बोलपटांत या सासूचें काम सर्वांत उत्कृष्ट होतें ( सुधा आपटे ). तिच्या प्रेमळपणामुळे नायिका या घरांत कांही दिवस टिकते, पण शेवटीं तिनें पाळलेलें मूल तिचेंच, असा तिच्यावर आरोप येऊन सासरा तिला घरांतून घालवून देतो आणि नवरा भेकडपणाने तिला जाऊं देतो. तथापि फेरविचार करून तो मुंबअीला वेगळें बिऱ्हाड करतो आणि तिला न्यायला येतो. तिला स्वातंत्र्याची हांव असल्यामुळे ती जात नाही, पण तिचा 'सुधारकी' आजा तिला फसवून कांहीतरी सबबीवर तिला नवऱ्याकडे आणून पोंचवतो ! त्या दोघांचें पटत नाहीच आणि अेकाच खोलींतल्या दोन पलंगांच्या मधे पडदा लावून ती निजते. या दोघांचें प्रेम असतें असें दाखवलें आहे, तथापि ती स्वातंत्र्याच्या अिच्छेने नोकरी धरते. अेका विधवा-विवाह मंडळांत अेक मूल नसलेली विधवा सेक्रेटरी पाहिजे, अशी जाहिरात वाचून ती जाते, तों अेका विवाहेच्छु मनुष्याशीं गांठ पडते, तरी ती नोकरी पतकरते, ती त्याच्याबरोबर सिनेमाला जाते व त्याच सिनेमाला नवरा अेका डाक्तरणीबरोबर गेलेला असतो. शेवटीं हें भांडण निकरावर येऊन ती घरांतून जाऊं लागते, तेव्हां नवरा तिला अडवतो आणि आपल्यावरचे सर्व आरोप खोटे आहेत असें ती सिद्ध करते. त्याचा बाप त्याचें दुसरें लग्न करून देण्याकरतां येतो, त्याचीही समजूत पटते.

यांत नायिका ( बिंबा ) आणि नायक ( आप्पा पेंडसे ) यांनी प्रथमच कामें केलीं आहेत, त्या मानानें तीं बरीं झालीं आहेत, परंतु दिग्दर्शन मात्र समाधानकारक नाही. नायिकेला हिस्टेरिआचे झटके येतात असें दाखवलें आहे, त्यांत सुधारकांचे दोष दाखवण्याची दृष्टि आहेच, तेव्हां तो दोष म्हणतां येत नाही. तथापि बांगड्या बाजूला करून झटक्यांत मनगटें चाव-

ण्याची तिची प्रवृत्ति अत्यंत कृत्रिम दिसते. अशा वेळीं आजाने तिच्या मुस्कटांत मारली म्हणजे झटका जातो आणि शेवटीं अेकदां ती मनगटें चावूं लागली असतांना आजा नवऱ्याला तिच्या मुस्कटांत मारण्याची हळूच सूचना देतो आणि त्याने मुस्कटांत मारतांच ती हंसूं लागते आणि त्याच्या छातीवर डोकें टेकते.

कित्येक ठिकाणीं दामूअण्णांचें कामही कमी पडलें आहे. कदाचित् अितक्या नांवाजलेल्या नटाला काही सांगण्याची जरूर नाही, म्हणून बेडेकरांनी तिकडे दुर्लक्ष केलें असेल, पण त्यांनाही सांगण्याची जरूर आहे असें दिसतें. उदाहरणार्थ त्यांची नात पाळलेल्या मुलाला घेऊन डाक्तराकडे जाते, तेव्हां मुलांचे रोग आईपासूनच आले असले पाहिजेत असें म्हणून तिलाही तपासण्याचा तो आग्रह धरतो आणि तिला बोलूं देत नाही. शेवटीं ती तपासून घेते, अितक्यांत आजा तेथे येऊन म्हणतो, ‘ फक्त गळा तपासला असतात म्हणजे काम झालें असतें. मंगळसूत्र नाही,तेव्हां लग्न झालेलें नाही.’ वास्तविक या शेवटच्या वाक्यावर जोर पाहिजे, तो न देतां आजा तें अितक्या सैलपणाने म्हणतो की तें फारच थोड्या प्रेक्षकांच्या लक्षांत आलें असेल. कोणत्या वाक्यांवर आणि कोणत्या शब्दांवर जोर द्यायचा, हें दिग्दर्शकाला सांगावें लागतें, पुष्कळ नटांना तें कळत नाही.

अेकंदरींत चूल व मूल हेंच बायकांचें क्षेत्र आहे, त्या बाहेर गेल्या तर त्यांना अितर पुरुष भेटतात, तेव्हां तें अिष्ट नाही, आणि त्यांनी जास्त गडबड केली तर मुस्कटांत दिल्याने त्या ताळ्यावर येतात, हें बेडेकरांनी आपल्या मताने सिद्ध केल्यामुळे हा बोलपट सनातन्यांना आवडण्यासारखा आहे.

---

# पत्रव्यवहार

१

१. २७-९-४७ च्या **धनुर्धारी**मध्यें, 'आजकालचें वाङ्मय' या मथळ्याखाली 'मालकंस, लेखक गोपीनाथ तळवलकर,' यावर अभिप्राय कृ. रा. क. नांवानें लिहिला आहे. तें पुस्तक वाचलेलें नाही म्हणून त्याबद्दल कांही लिहितां येत नाही, परंतु कृ. रा. क. यांनी 'सौंदर्यवादाच्या नांवाखाली भोगवादाचा पुरस्कार करतांना लेखकाने नागपुरी किंवा लखनवी भोगवादाचा पुरस्कार केला नाही हें वाचकांचें भाग्यच म्हटलें पाहिजे,' असें लिहिलें आहे. जगांत भोगाशिवाय नपुंसकावांचून कोणी राहिलेलें नाही. तरी नागपुरी किंवा लखनवी भोगाचें काय प्रकरण आहे तें कळत नाही. तरी त्याचा खुलासा आपल्या मासिकांत केल्यास बरें होईल. २. तसेंच विष्णु सदाशिव सोहोनी यांस उत्तर देतांना 'बलवंत' पत्राने त्यांचा लेख छापला नाही याबद्दल आपण आश्चर्य प्रगट केलें आहे. आपला पहिला लेख 'किर्लोस्कर' मासिकानें न छापल्यामुळेच आपण 'समाजस्वास्थ्य' मासिक काढून तूट येत असतां सुद्धां चालू ठेवलें असून आमचेसारख्या स्वतंत्र विचार करणाऱ्या माणसांवर उपकार केले आहेत, तेव्हां आपणास आश्चर्य वाटण्याचें कारण नव्हतें. पुष्कळ लेखक आपलीं खरीं मतें मांडण्यास भितात, यामुळें समाजाला मार्गदर्शक असे आपल्यासारखे लेखक क्वचितच दृष्टीस पडतात. आपला **दत्तात्रय शिवराम चिखले.**

उ. १. सदर टीका विकृत मनाच्या माणसाने लिहिली आहे हें उघडच आहे आणि तीवर श्री. तळवलकरांनी **धनुर्धारी**च्या १८ आक्टोबरच्या अंकांत उत्तर लिहिलें आहे. नागपूरविषयी आम्हाला माहिती नव्हती, पण लखनौची अशी प्रसिद्धि आहे की तेथील पुष्कळ पुरुषांना स्त्रियांविषयी आकर्षण न वाटतां पुरुषांविषयीच वाटतें. याला आमच्या कामशास्त्रावरील पुस्तकांत 'समसंभोग' म्हटलें आहे. हा प्रकार प्राचीन

ग्रीस देशांत सर्रास चालू होता आणि त्या काळच्या कांही नांवाजलेल्या विद्वानांचीं नांवें या बाबतींत प्रसिद्ध आहेत. **सं.**

२

माझे अेका मित्राची हकीकत खालीलप्रमाणें आहे. सदर असिम सुमारें २४ वर्षांचा असून तो अेका वेश्येचा मुलगा आहे. तो शाळेंत मास्तर असून त्याचें लग्न होऊन दोन वर्षें झालीं आहेत. त्याची आई अजून वेश्याव्यवसाय करते हें त्याला पसंत नसल्यामुळे त्यांचीं भांडणें होतात व मुलास समाजांत विटंबना सहन करावी लागत असल्यामुळे तो नेहमी चिंताक्रांत व दु:खी असतो. या चिंतेचें कारण काय असावें म्हणून मी त्यास नेहमी खोदखोदून विचारीत असें, तेव्हां त्याने अेक दिवस माझ्याशीं मन मोकळें करून सांगितलें तें असें. 'माझा जन्म अेका वेश्येच्या पोटीं झाला म्हणून समाज माझा तिरस्कार करीत असल्यामुळे व माझी आअी अजून वेश्याव्यवसाय करते तें मला पसंत नसल्यामुळे मला मानसिक यातना होतात. या बाबतींत मी अेका शास्त्रीबुवास विचारलें असतां त्यांनी असल्या आअीचें तोंड पाहूं नये म्हणून सांगितलें, तरी मी काय करावें याबद्दल ठाम मत होत नाही.' हीं त्याच्या उदासीनपणाचीं कारणें अैकून मी त्यास सांगितलें की धर्म, पुनर्जन्म, वगैरेवर स्वत:चा विश्वास नसून सुद्धां लोकांना थापा देऊन हे लोक मोठेपणा मिळवून स्वार्थ साधतात हे तुला समजतें ना? मग तूं अशा माणसांवर विश्वास कां ठेवावा? समाजाच्या दृष्टीने तुझी आअी वेश्या असली तरी ती तुझी आअी आहे हें विसरून तूं तिला दु:ख देऊं नको. फार तर तूं वेगळा रहा, पण तिला दुखवूं नको. आजपर्यंत उंच नीच या नांवाखाली तुझाच छळ झाला असें नाही, तर कर्ण, सत्यकाम-जाबाल, उदयभानु, वगैरे अंगच्या तेजाने जगास दिपवणारांना सुद्धां समाजाने अपमान करून त्रास दिला हें तुला माहीतच आहे. आणि महानंदा वेश्या असून सुद्धां पुराणिकबुवा हजारों स्त्रीपुरुषांत तिच्या नांवाचा गौरवाने उच्चार

करीत आहेत. अनाथाश्रमांतलीं मुलें सुद्धां तुझ्यासारखींच आहेत. केव्हांतरी राष्ट्राला या बाबतींत विचार करावा लागेल, असें सांगून आपले मासिकांतील कांही लेख दाखवल्यावर त्याची समजूत होऊन आओचीं व त्याचीं भांडणें जरी बंद पडलीं आहेत, तरी त्याचे चेहऱ्यावर दुःख आणि असमाधान दिसतें. तरी आपणच या बाबतींत योग्य सल्ला मासिकांत दिल्यास त्याच्यासारख्या मुलांमुलींना समाधान वाटेल. आपला ५०१.

उ वेश्यांचा धंदा नीच समजलेला आहे, परंतु तो अत्यंत उपयुक्त आहे असें मत अमेरिकेंतील प्रख्यात डॉ. रॉबिनसन यांनी दिलेलें आहे. वेश्या नको असतील तर अगोदर विवाहसंस्था बंद केली पाहिजे. विवाहित स्त्रियांचें पातिव्रत्य आणि कुमारिकांचें कौमार्य जर कायम रहायला पाहिजे असेल, तर वेश्यांशिवाय भागणार नाहीं. सर्वांनीं अगदीं नीतीने वागायचें ठरवलें, तर ज्या शेंकडों पुरुषांना आज लग्न करणें अशक्य आहे, त्यांनी काय करावें ? ते सर्व ब्रह्मचर्यानें राहतील अशी कल्पना फक्त गांधींसारख्या वेड्यांच्याच मनांत येऊं शकेल, पण कोणीही समंजस मनुष्य तसें म्हणणार नाहीं, कारण तें अशक्य आहे. तेव्हां गर्तीं स्त्रियांचें 'पावित्र्य' जर समाजाला पाहिजे असेल, तर वेश्यांचा धंदा हा उपयुक्त म्हणून समाजानें मान्य केलाच पाहिजे, कारण दुसरा मार्गच नाही. तेव्हां अशा उपयुक्त धंद्याला नीच न समजतां वेश्यांना समाजाने योग्य दर्जा दिला पाहिजे. डॉ.रॉबिनसन यांचें मत असें आहे की परिचारिका जशा समाजाच्या उपयोगी पडतात, तशाच वेश्याही प्रकृतीच्या दृष्टीने उपयोगी पडतात, तेव्हां त्यांचा दर्जा परिचारिकां-सारखाच समजावा. पुरुषांना संभोगाची जरूरी प्रकृतीच्या दृष्टीने असते आणि अशा प्रकारचा सल्ला देण्याचा प्रसंग डॉक्तरांवर पुष्कळ वेळां येतो. प्रामाणिक डाक्तर असेल तर असा सल्ला दिल्याशिवाय गत्यंतर नसतें. अशा वेळीं समाजांत वेश्या नसतील तर पुरुषांनी काय करावें ? त्यांची प्रकृति बिघडली तरी चालेल, असें कांही लोक म्हणतील, पण या लोकांना बहुधा स्वतःच्या बायका असतील किंवा ते नपुंसक असतील. हा समंजसपणा नाही.

समागमाचा हक्क प्रत्येक व्यक्तीला असलाच पाहिजे. ही शारीरिक गरज समाजाने ओळखली नाही, तर पातिव्रत्य, कौमार्य वगैरेवर पाणी सोडावें लागेल. तेव्हां ज्या वेश्या खुषीनें धंदा करीत असतील, त्यांचे समाजाने आभार मानले पाहिजेत, कारण हा धंदा करण्यास कोणीच तयार नसल्यास मोठी पंचाअीत होअील आणि चालू नीतीच्या कल्पना बदलाव्या लागतील. तशी तयारी नसेल तर वेश्यांचा उपयोग समाजाने ओळखला पाहिजे. **सं.**

३.

मासिक स्राव बंद होऊन ४-५ वर्षें झालेल्या ४५-४६ वर्षें वयाच्या निरोगी पत्नीशीं समागम घडल्यास गर्भधारणेची भीति आहे की काय? असल्यास कितपत व कधींपर्यंत आहे? अशा बाबतींत गर्भधारणा पूर्णपणें अशक्य आहे असें खात्रीपूर्वक सांगतां येअील काय? **अेक वाचक.**

**उ.** खात्रीपूर्वक सांगतां न आलें तरी गर्भधारणेची भीति जवळ जवळ नाहीच असें समजण्यास हरकत नाही. **सं.**

४

आक्टोबरच्या अंकांतील दुसरें पत्र अेका अभागिनीचें आहे. अशा स्त्रिया समाजांत बऱ्याच दिसतात. आम्ही प्रौढ स्त्रियांस मुद्रणाचें काम शिकवण्यास सुरवात केली, त्यांतही विधवा किंवा कुमारींपेक्षां परित्यक्ताच अधिक आल्या. यांपैकीं दोन तीन स्त्रिया हल्ली दरमहा वीस रुपये मिळवतात. फुसलावण्याचे फिर्यादीचे पद्धतीमुळें अेका पदवीधर, सासरा व घर असलेल्या तरुणीस आश्रमांत ठेवून घेणें शक्य झालें नाही. दीर समक्ष आश्रमांत येऊनही तिला घरीं नेअीना. आम्ही सोडवून आणूं, तर तीच भीति आम्हांस. हिंदुसभेस कळवलें, पण तिचे हातूनही कांहीं झालें नाही. सुदैवाने ती पुन्हा बापाचे घरीं जाऊं शकली. अशा स्त्रियांचे उपयोगाकरितां मुद्रणकामाची व शिक्षणाची माहिती आम्ही देतों. आपला **वि. वि. लिमये,** श्री विठ्ठल

प्रसाद छापखाना, पंढरपूर.

उ. आपला उपक्रम स्तुत्य आहे आणि त्याचा फायदा पुष्कळ स्त्रिया घेतील अशी आशा आहे. पण हल्लीच्या दिवसांत वीस रुपयांत अेका स्त्रीचें तरी पोट भरतें काय ? कदाचित् पंढरपूरसारख्या ठिकाणीं भरतही असेल, पण हा पगार हल्लीच्या मानानें फारच कमी आहे. **सं.**

५

माझें वय ४०–४२. आज दोन वर्षें विटाळ बंद. तो पूर्ववत् सुरू होण्याचे उपाय सुचवा. या बंद विटाळाचे परिस्थितींत मूल होणें शक्य आहे काय ? अितकीं वर्षें नवऱ्याशिवाय काढलीं आणि आतां कुठें संबंध होऊं लागला तों अशी परिस्थिति ! या कामीं योग्य डॉक्टरचें नांव सुचवलेंत तरी चालेल.

आपली **अेक वाचिका.**

उ. आपलें वय आपल्याला नक्की माहीत नसावें हे आश्चर्य आहे. आपण डाक्तरचा सल्ला घ्यावा, मात्र तो स्त्रीरोगतज्ञ असावा. येथें आम्ही नांव सुचवूं शकत नाही. विटाळ बंद असतांना अर्थात्च मूल होणार नाही, पण तो अजीबात बंद झाला आहे की काय हें कळणें कठिण. तरी अगदीच आशा सोडण्याचें कारण नाही. **सं.**

---

# शारदेचें पत्र

स्वातंत्र्य मिळाल्यावर जी अंदाधुंदी सुरू झाली, तीबद्दल पाकिस्तान आणि हिंदुस्थान परस्परांना नांवें ठेवीत आहेत आणि दोघांच्याही म्हणण्यांत तथ्य आहे असें म्हणावें लागतें. काश्मीरवर कांहीं लुटारू टोळ्यांनी हल्ला केला आणि या लुटारूंना पाकिस्तानने शस्त्रास्त्रें पुरवलीं असलीं पाहिजेत हें उघड दिसतें आणि याबद्दल पाकिस्तान दोषास पात्र आहे यांत शंका नाही. पण अिकडे हिंदुस्थानांतला अेक अिसम खाजगी सैन्य गोळा करून

जुनागडावर हल्ला करून त्यांतला कांहीं भाग काबीज करतो याचा अर्थ काय? या स्वारीच्या हकीकती अेकसारख्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होत असतांना हिंदुस्थान सरकारने त्याची दखल घेऊं नये याचा अर्थ काय? या खाजगी सैन्याला हिंदुस्थान सरकारची फूस होती, असें अगदी तिऱ्हाइत मनुष्याला देखील साहजिक वाटेल, कारण अेरवीं हिंदुस्थान सरकारने त्याचा बंदोबस्त करायला पाहिजे होता. जुनागड पाकिस्तानांत सामील झालें होतें, तें बरोबर म्हटलें किंवा चूक म्हटलें तरी या खाजगी स्वारीचें समर्थन होत नाही. नंतर जुनागडने हिंदुस्थान सरकारकडे मदत मागितल्यामुळें त्यांनीं संस्थानाचा कारभार आपल्या हातांत घेतला, यावरून तर असेंच म्हणतां येअील की हिंदुस्थान सरकारनेच या खाजगी स्वारीला फूस दिली होती. ही तिऱ्हाअिताची दृष्टि झाली. मी या बाबतींत हिंदुस्थान सरकारच्या बाजूची असल्यामुळे मी तसें म्हणत नाही, पण खाजगी फूस म्हटली नाही तरी मी याला अंदाधुंदी खास म्हणेन.

आज हिंदुस्थान कॉंग्रेसच्या ताब्यांत आहे आणि आपलें वर्चस्व कायम ठेवण्याकरतां कॉंग्रेस शक्य अितकी खटपट करणार हें उघड आहे. अशा वेळीं कॉंग्रेसच्या विरोधकांनीं सावध राहिलें पाहिजे. स्वतःच्या पक्षांतल्या लोकांना सगळ्या अधिकाराच्या जागा द्यायच्या, नालायक माणसां-करतां भरपूर पगाराच्या नवीन जागा निर्माण करायच्या, आणि आपल्या पक्षांतल्या लोकांचें पाहिजे तें चोज पुरवायचें, हें ज्यांना पसंत नसेल, त्यांनी जो कोणी कॉंग्रेसच्या विरुद्ध उभा असेल त्यालाच मत दिलें पाहिजे, मग तो आपल्या पक्षाचा असो की नसो, हेंच धोरण ठरवलें पाहिजे. दुसरे पक्ष मोठेसे चांगले असतात असें नाही. कॉंग्रेसने लाजेकाजेस्तव मंत्रिपदावर नेमलेल्या श्यामाप्रसाद मुकर्जींनी अेका फडतूस बंगाल्याकरतां आपल्या हाताखाली नवीन जागा निर्माण केलीच. पण विजयलक्ष्मी पंडित यांनीं कचेरीला शोभा आणण्याकरतां जवळ जवळ नऊ लाख रुपये, आणि

मौलाना आझाद यांनी घरसामानाकरतां रु. ३६००० मागणें, म्हणजे आपल्या पक्षाकडे सत्ता आल्यामुळें जनतेचे पैसे खाऊं पाहणें नव्हे तर काय? अशी मागणी केल्यावर ती सगळीच मान्य न झाली तरी फारशी कमी होत नाही आणि ती कमी होणार हें समजूनच मूळची मागणी केलेली असते. यावरून काँग्रेस सरकार स्वपक्षीयांच्या: फायद्यासाठी जनतेच्या पैशाचा दुरुपयोग करीत आहे हे कोणालाही कळण्यासारखें आहे. अशा मागण्या करणारांबद्दल कोणालाही अितःपर आदर वाटणें शक्य नाहीं. प्रथम आपल्या कुंटुंबांतल्या माणसांची, आणि नंतर आपल्या स्नेह्यांची आणि बगलबच्च्यांची भर करायची, या धोरणाला कोणीही प्रामाणिक मनुष्य विरोधच करील.

या विरोधामुळे काँग्रेसचें आसन डळमळीत होअील या भीतीनें स. का. पाटील यांनी नगरपालिकेच्या निवडणुकीबाबत अेक नवीच युक्ति काढली आहे. ते आतां असें म्हणूं लागले आहेत की आतां काँग्रेस आपल्या पक्षाबाहेरच्या लोकांना देखील पाठिंबा द्यायला तयार आहे, तीं माणसें लायक मात्र असलीं पाहिजे. पण 'लायक' या शब्दाचा अर्थ पाटलांच्या कोशांत असा दिला आहे की त्यांनी जरी खादी घातली नाही किंवा चरका फिरवला नाही, तरी ते काँग्रेसच्या धोरणाला आणि करणीला मान तुकवणारे असले पाहिजेत. पाटील म्हणतील तेव्हां हात वर करा, मग बाकी तुम्ही पाहिजे तें केलें तरी चालेल, असें हें धोरण आहे. दुर्दैवाने काँग्रेसला शह देअील असा पक्षच आज नाही, तेव्हां अितक्यांतच काँग्रेसच्या आसनाला धोका आहे असें नाहीं, पण विरोधकांनी या दिशेनें शक्य ते प्रयत्न करणें जरूर आहे.

स्वतःलाच काय तीः अक्कल आहे आणि अितरांना नाही, असें कांग्रेसचे महात्मा गांधी जरी स्वतः समजत असले, तरी त्यांनी मंत्र्यांना स्पष्ट बजावलें आहे की तुम्हालाच काय ती अक्कल आहे आणि अितरांना

नाही, असें तुम्ही समजूं नका. कांग्रेसची नीतिबाजी आणि दडपशाही या घमेंडखोर समजुतीवरच आधारलेली आहे. मुरारजी देसायांना वाटतें की नीति म्हणजे काय हें फक्त मलाच समजतें, अितरांना समजत नाही, आणि मी जिला नीति म्हणेन ती जबरदस्तीने जनतेवर लादण्याचा मला हक्क आहे. ही शुद्ध अरेरावी आहे आणि अशाच अरेरावीबद्दल आम्ही हिटलर, म्युसोलीनी, स्टालीन, वगैरेंना नांवें ठेवतों. ही अरेरावी कांग्रेसने केली तरी तिला आमच्यासारख्या स्वातंत्र्याच्या भोक्त्यांनी नांवेंच ठेवलीं पाहिजेत, त्यांना पाठिंबा देतां नये. अरेरावी कोणीहि केली तरी ती वाअीटच, नाहीतर आपला तो बाब्या आणि दुसऱ्याचा तो कारटा, असें म्हणण्यासारखें होतें, आणि हा समंजसपणा नव्हे. जुगार बंद करा, दारू बंद करा, तमाशे बंद करा, शर्यती बंद करा, वेश्यांचा नायनाट करा, असा उपदेश करण्याचा हक्क कोणालाही आहे आणि त्याबद्दल कोणी कोणाला नांवें ठेवणार नाही, पण या गोष्टी कायद्याने बंद करूं पाहणें म्हणजे जुलूम तर आहेच, पण हे प्रकार यशस्वी रीतीने बंद करणें अशक्य आहे. जे प्रकार उघडपणें करतां येत नाहीत ते चोरून होतात, इतकाच फरक कायद्याने होतो. अर्थात् घोड्यांच्या शर्यती चोरून करतां येणार नाहीत, पण शर्यती बंद केल्या म्हणून जुगार बंद होत नाही. हल्लीही जुगाराविरुद्ध कायदा आहे, पण लोक रस्त्यावर सर्वांच्या देखत जुगार खेळत असतात, तें पोलीसला मात्र दिसत नाही. हे प्रकार बंद करायचे असतील तर लोकशिक्षण हा त्याला उपाय आहे, जबरदस्ती हा नव्हे. वेश्यावृत्ति तर विवाहसंस्थेचा आधार आहे. विवाहासंबंधी कडक कायदे करून वेश्यावृत्ति देखील नको म्हटलें तर तें कायद्यानें साध्य होणार नाही, तो धंदा भूमिगत होअील अितकेंच. कोणाही समंजस माणसाला या गोष्टी कळाव्या, पण हा समंजस माणसांचा काळ नाही, अरेरावांचा काळ अजून संपला नाही. कांग्रेस लोकशाहीच्या गप्पा मारते, त्यांच्या हातून लोकशाही निर्माण होणें अशक्य आहे.

कांग्रेसच्या दडपशाहीचा अेक नमुना म्हणजे हिंदु महासभेचे थत्ते यांच्याशीं सरकारची वागणूक. ब्रिटिश सरकार राजकीय कैद्यांना अ वर्गांत ठेवीत असे. आतां आपलेंच सरकार असल्यामुळे त्यांना ही सवलत देण्याचें कारण दिसत नाही. थत्त्यांना दिल्ली येथे क वर्ग देऊन चोवीस तास कोठडींत बंद करीत असत आणि त्यांना लिहिण्यावाचण्याचीही परवानगी नव्हती. निजाम सरकारनेही कैदेंत आपल्याला जास्त चांगलें वागवलें होतें, अशी त्यांची तक्रार आहे. उघडच आहे, ब्रिटिश सरकार काय किंवा निजाम काय, राजकीय कैद्यांना घाबरून त्यांना अ वर्ग देत असत. पण आपल्या सरकारला घाबरायचें कांहींच कारण नाहीं, तेव्हां कैद्यांचे पाहिजे तसे हाल करायला काय हरकत आहे, असें साहाजिकच त्यांना वाटतें. कोणत्याही कैद्याचे हाल होतां नयेत, असें नवीन धोरण सुधारलेल्या राष्ट्रांत अंमलांत येत आहे, याची हिंदुस्थान सरकारला दादच नाहीं. आणि कशी असणार ? हिंदुस्थान सुधारलेलें थोडेंच आहे ?

कॉंग्रेस सरकारला स्वतःची जाहिरात करायची आहे असें जें मी नेहमीं म्हणतें, त्याचा आणखी अेक पुरावा म्हणजे त्यांचें रिक्शाविषयी निघालेलें फर्मान. माणुसकीच्या दृष्टीने त्या बंद करण्याचा हूकूम दिला, कारण जनावराप्रमाणें माणसांना गाडीला जोडण्याने माणसाचा अपमान होतो, हें केवळ ढोंग आहे. पुण्यांत ज्या सायकल-रिक्शा आहेत, त्यांना माणसें जोडलेलीं नसतात, त्या चालवणारा मनुष्यही बसलेलाच असतो. मात्र तो सायकल चालवीत असतो अितकेंच. अेकटा सायकलवर बसून पाय चालवण्याने जर मनुष्याचा दर्जा कमी होत नाही, तर सायकल-रिक्शाने तरी कमी कसा होतो ? पण नाहीं, कोठें कोठें माणसें रिक्शा ओढीत नेतात, तेव्हां रिक्शा हें नांवच कमीपणा आणणारें आहे, अशी खोटीच समजूत करून घेऊन-किंवा करून घेतल्याचें ढोंग करून-रिक्शा बंद करण्यांत कॉंग्रेसला काय भूषण वाटत असेल तें असो ! हल्लीं पेट्रोल नसल्यामुळें मोटरी आणि

बसी जवळजवळ बंद झाल्या आहेत, टांगेवाले भरमसाट पैसे मागतात आणि हें सरकार आतां रिक्शा बंद करतें आहे. अेकंदरींत लोकांचे हाल करण्यांतच या सरकारला धन्यता वाटते यांत मला तरी शंका नाहीं. दुसऱ्याला त्रास दिल्याशियाय सत्ता गाजवल्याचें समाधान त्यांना मिळत नाहीं! मंत्र्यांना मोटरींतून हिंडतां येतेंच आहे, त्यांचें पेट्रोल कमी होत नाहीं. लोकांचें कांहीं कां होअीना? आणि शिवाय आपल्या माणुसकीची जाहिरात होते. धन्य आहे कॉंग्रेस सरकार! तुझी **शारदा**

---

## किरकोळ

जपानमधें नेमलेल्या अेका समितीने संततिनियमनाला पाठिंबा दिला आहे अितकेंच नव्हे तर सुप्रजाजननाच्या दृष्टीनें गर्भपाताच्या कायद्यांतही फरक करण्यांत येणार आहे असें म्हणतात.

* * *

हॉलंडमधें संततिनियमनाचा प्रसार सर्वांत जास्त झाला आहे, तरी देखील लोकसंख्या अेकसारखी वाढत आहे. कारण तेथें मृत्यूचें मान फारच कमी झालें आहे. तेथील लोकसंख्या १९४० चे आरंभीं ८८,३४,००० होती. ती १९४६ चे आरंभीं ९२,९५,००० भरली. आरोग्याच्या दृष्टीनें हॉलंडसारखा देश क्वचितच सांपडेल.

* * *

जर्मनींतल्या अमेरिकन अधिकाऱ्यांनी नुकतीच जर्मनीची शिरगणती केली, तेव्हां अेकंदर लोकसंख्या ६,५९,११,००० भरली. युद्धापूर्वी स्त्रियांची संख्या पुरुषांपेक्षां वीस लाखांनी जास्त होती, ती आतां ७० लाखांनीं जास्त झाली आहे. याशिवाय सध्यां बाहेरचे ११ लक्ष लोक जर्मनींत आहेत.

* * *

# स मा ज स्वा स्थ्य

## वर्गणीची माहिती

हें मासिक दर १५ तारखेला प्रसिद्ध होतें. वार्षिक वर्गणी तीन रुपये, व्ही. पी. ने सवातीन. पोर्तुगीज प्रांतांत किंवा परदेशीं व्ही. पी नाही. हिंदुस्थानाबाहेर साडेतीन रुपये किंवा पांच शिलिंग. मनीऑर्डर केल्यास चार आणे वांचतील. अंक न पोंचल्याची तक्रार महिना संपण्याचे आंत आम्हास मिळाली पाहिजे. पुणें येथील ग्राहकांनी ६९–१, लॉ कॉलेज रोड, येरंडवणें येथें वर्गणी भरल्यास चालेल.

**राअिट अेजन्सी,** १३ नवी भटवाडी, मुंबई ४

# आमचेकडे मिळणारा माल

| | |
|---|---|
| **लॅम्बट डच कॅप**, आकार ५५ ते ७५, प्रत्येकीं | रु. ५ |
| **उभट कॅप** ( देशी ) लहान, मध्यम किंवा मोठी, | रु. १॥ |
| **राअिट कॉंट्रॅसेप्टिव्ह जेली,** | रु. ३॥ |
| **पुरुषांकरतां पिशव्या,** | ४ आणे, ८ आणे, १ रुपया |
| **कषायचूर्ण,** ( योनिमार्ग धुण्याकरतां ) | बाटलीस अडीच रुपये |
| **राअिट हेअर लोशन,** ( कुंतलरक्षक ), | बाटलीस तीन रुपये |
| **कामोत्तेजक नंबर १,** (प्रकृतीकरतां) | बाटलीस चार रुपये |
| **राअिटयूब,** ( रोगप्रतिबंधाकरतां ) | रु. १ |

**जेलोटयूब** (फ्रेंच, रोगप्रतिबंधाकरतां), २ नळ्यांचे पेटीस अडीच रुपये

**राअिट अेजन्सी,** १३ नवी भटवाडी, मुंबई–४.

Registered No. B 2289.

राइट एजन्सी, नं. १३, नवी भटवाडी, मुंबई, नं. ४.

## प्रो र. धों. कर्वे, एम्. ए. कृत पुस्तकें

१. **आधुनिक आहारशास्त्र**, किं. १॥ रु., ट. ख, ५आणे.
२. **आधुनिक कामशास्त्र** [ सचित्र ], चौथी आवृत्ति
किंमत रु. ४, ट. ख. ६ आणे.
३. **संततिनियमन** [सचित्र], ९ वी आ. १। रु. ट.ख.४आ.
४. **गुप्त रोगांपासून बचाव**, ४थी आ.रु १, ट.ख.४आणे.
५. **'समाजस्वास्थ्य'** मासिकांतील निवडक लेख,
भाग १ ला [ पहिलीं तीन वर्षें ], खलास आहे.
भाग २ रा [वर्षें ४-५-६], किं. २-०-०, ट.ख.५आ.
६. **त्वचेची निगा.** किं. ८ आ., ट. ख. ४ आ.
७. **गुरुबाजी** (नाटक) किं. ८ आ., ट. ख. ४ आणे
८. **वेश्याव्यवसाय**, किं. २ रु., ट. ख. ५ आ.
९. **तेरा गोष्टी**, किं. १ रु. ट. ख. ४ आ.
१०. **न्यायाचा शोध** ( नवीन सामाजिक नाटक )
किंमत १ रु., ट. ख. ४
११. **पॅरिसच्या परी**, किं. ३ रु., ट. ख. ५ आणे.

डॉ. के. भा. लेलेकृत

१. **बाहेरख्यालीचे दुष्परिणाम**, २ री आ., किं. ५आ.
२. **मूळव्याध.** किं. ४ आ.

मुद्रण स्थळः—पॉप्युलर प्रिंटिंग प्रेस, १०३, ताडदेव रोड, मुंबई नं. ७

मुद्रक व प्रकाशकः—**रघुनाथ धोंडो कर्वे, राइट् एजन्सी,**
नं. १३, नवी भटवाडी, गिरगांव, मुंबई